MHKO150001262026

**कि.फौ.अर्ज क्र. १४/२०२६.**
**गणपत वि. रा. उ. शुल्क, कोल्हापूर (गड.).**

## <u>निशाणी क्र.१ वरती आदेश.</u>

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ प्रमाणे गुन्हा रजि. क्र. २४५/२०२५ मध्ये राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर (गडहिंग्लज) यांनी जप्त केलेल्या त्याच्या मालकीच्या सँट्रो गाडी क्र. एम.एच.–०८–सी–४३६० चा अंतरीम ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदाराचे थोडक्यात कथन की, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर (गडहिंग्लज) विभागाच्या पोलिसांनी वरील प्रमाणे त्याच्यावर गुन्हा दाखल करुन त्याची गाडी जप्त केलेली आहे. सदर गुन्हयाचा तपास होऊन प्रकरण चौकशीस येण्यास बराच वेळ लागणार असून तो पर्यंत गाडी विनावापर पडून राहिल्यास तीचे नुकसान होणार आहे. त्याला त्याच्या व्यवसायासह इतर कामांसाठी गाडीची आवश्यकता असून तो न्यायालयाने घालुन दिलेल्या सर्व अटी व शर्तींची पुर्तता करण्यास तयार आहे. सबब, त्याने जप्त गाडीचा अंतरिम ताबा मिळण्याची विनंती केली आहे.

**३.** अर्जदाराच्या मागणीवरुन सरकारी वकीलांचे व राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर (गडहिंग्लज) यांचे म्हणणे मागविण्यात आले. त्यांनी नि. क्र.६ व ७ प्रमाणे म्हणणे देऊन अर्जास आक्षेप घेतला आहे. त्यांच्या कथनाप्रमाणे, अर्जदाराने सदर गाडीचा अवैध दारु वाहतूकीसाठी वापर केलेला असल्यामुळे गुन्हयाचा तपास चालू असल्याची बाब विचारात घेता, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. राज्य उत्पादन शुल्क तपासी अधिका–याने जप्त वाहन परत दिल्यास तपासकामी व पुराव्यास अडचण निर्माण होणार असल्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**४.** अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता अर्जदाराने त्याच्या आधार ओळखपत्राची प्रत (नि.क्र.३/१), जप्त गाडीच्या आर.सी.बुक ची प्रत (नि.क्र.३/२), गुन्हा रजि. क्र.२४५/२०२५ च्या एफ. आय. आर ची प्रत (नि.क्र.३/३) आणि विम्याची

प्रत (नि.क्र.३/४) वरती दाखल केलेली आहेत. (*सदरील कागदपत्रांची मूळ दस्ताप्रमाणे तपासणी करुन ते अर्जदाराच्या वकिलांच्या ताब्यात देण्यात आले आहेत.*) अर्जदाराच्या वकिलांनी, अर्जदार हा न्यायालयाने घालुन दिलेल्या सर्व अटींचे पालन करण्यास तयार असून तीची इतर कोणीही मागणी केलेली नसल्यामुळे अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. सरकारी वकिलांनी गुन्हयाचे स्वरुप विचारात घेता, योग्य त्या अटी व शर्तींवर अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**५**. तपासी अधिका–याच्या लेखी जबाबाचा विचार करता त्याने गुन्हयात वापरलेला जप्त वाहन दारुबंदी गुन्हयात जप्त केलेले असून त्यांच्या कार्यालयात सुरक्षित आहे व मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ यांनी दिलेल्या क्रि.रि.अर्ज. क्र. ६७०/२००२ या न्यायनिर्णयाचा संदर्भ देऊन सदर वाहनामधून पुन्हा अवैध वाहतूक होण्याची व त्यामुळे शासनाचा महसूल बुडण्याची शक्यता असल्याचे सांगितले आहे. तसेच दिलेल्या मा. उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांनी दिलेल्या क्रि.रि.अर्ज.क्र. १०९६/२००२ न्यायनिर्णया प्रमाणे जप्त वाहन सोडायचे असल्यास वाहन किमतीच्या रकमेवर ५० टक्के इतक्या रकमेचे हमीपत्र घेण्यात यावे असा निष्कर्ष नोंदवलेला आहे.

**६**. सबब, वरील न्यायनिर्णयांचे अवलोकन केले असता, सदर प्रकरणात मागणी केलेल्या मुद्देमालाबाबत जप्ती प्रक्रिया चालू झाल्याची कोणतीही बाब तपासी अंमलदाराने पटलावरती आलेली नसल्यामुळे हे न्यायालय जप्त वस्तूचा अंतरिम ताबा देण्याचे आदेश करु शकते. अर्जदाराने जप्त गाडीच्या मालकी हक्काबाबत आवश्यक ती कागदपत्रे सादर केलेली असून तो जप्त गाडीचा प्रथमदर्शी मालक व ताबेदार असल्याचे दिसून येते. तसेच जप्त गाडीची अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही मागणी केलेली नसून संबंधित पोलिस विभागाचा अथवा सरकार पक्षाचा अर्जदाराने अथवा आरोपीने जप्त गाडीचा इतर गुन्हयात वापर केल्याचा देखील आरोप नाही. अर्जदाराने नि. क्र.८ प्रमाणे जप्त गाडी ताब्यात मिळाल्यानंतर तिचा ३० दिवसांमध्ये विमा सादर करण्याचे हमीपत्र देखील दिलेले आहे.

**७**. अर्जदाराच्या गाडीची सरकार पक्षास पुराव्यासाठी उपयुक्तता नसून तिच्या छायाचित्रांद्वारे देखील सरकार पक्ष सदर बाब सिध्द करु शकत असल्यामुळे सदर गाडी पुराव्याकामी अटकावून ठेवून कोणताही उपयोग होणार नसून ती पडून राहिल्यास तीचे

नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर वाहनाचा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ***सुंदरभाई देसाई वि. गुजरात राज्य***[1] मधील मार्गदर्शक तत्वास अनुसरुन अंतरीम ताबा देणे न्यायोचित ठरते. सबब, अर्जदाराचा सँट्रो गाडीचा अंतरीम ताबा देण्याचा अर्ज निवडक अटी व शर्तींवरती मंजूर करणे आवश्यक असल्यामुळे, मी वरील विवेचनावरुन खालील आदेश पारीत करीत आहे,

**<u>आदेश</u>**

१. अर्ज खालील प्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदारास राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर (गडहिंग्लज) यांनी गुन्हा रजि. क्र. २४५/२०२५ मधील जप्त सँट्रो गाडी क्र. एम.एच.–०८–सी–४३६० चा ४,००,०००/– रुपयांच्या सुपुर्दनाम्यावरती नियमा प्रमाणे ताबा द्यावा.

३. राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर (गडहिंग्लज) यांनी अर्जदाराला जप्त सँट्रो गाडीचा ताबा देण्यापुर्वी त्याचा दोन पंचासमक्ष संपुर्ण पंचनामा करुन त्याच्या खर्चाने फोटो काढुन दोषारोप पत्रासोबत दाखल करावेत.

४. अर्जदाराने जप्त सँट्रो गाडीचा इतर गुन्हयात स्वतः अथवा इतरांना वापर करण्यास परवानगी दिल्यास या प्रकरणात दिलेली सुपूर्तनाम्याच्या बंधाची रक्कम त्याच्याकडून वसूल करण्यात यावी.

५. आदेशाची प्रत संबंधित राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर (गडहिंग्लज) यांच्या कार्यालयाला पुर्तते करीता ई–मेल द्वारे पाठवावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

**(आर. पी. थोरे)**

आजरा. जे.ओ.कोड –००२८९७

दि. ११.०४.२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

1 ए.आय.आर. २००३ एस.सी. ६३८.